महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

# रोजगार व स्वयंरोजगार विभाग

१४वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

# प्रस्तावना

रोजगार व स्वयंरोजगार विभागाची **"नागरिकांची सनद"** प्रसिध्द करताना मला अतिशय आनंद होत आहे. सध्याचे जग हे जागतिकीकरणाकडे मोठ्या वेगाने वाटचाल करीत आहे. या स्पर्धेच्या युगात सर्वच संस्थांना त्यांच्या कामाचा तसेच सेवांचा दर्जा राखणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावर सुरु केलेल्या प्रशासकीय सुधारणांच्या कार्यक्रमांमध्ये विविध शासकीय विभागांकडून नागरिकांना दिल्या जाणा-या सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी विविध उपाययोजनांवर भर दिला जात आहे. देशातील नागरिक हा केंद्रबिंदू मानून शासनाकडून पुरविण्यात येणा-या विविध प्रकारच्या सेवा व योजनांची अंमलबजावणी करताना पारदर्शकता, नियमांप्रमाणे कामकाज, कामाची कालमर्यादा, कामाचा दर्जा, कार्यक्षमता राखणे व शासकीय सेवा पुरविण्यामध्ये स्तर निश्चित करुन जबाबदारी निश्चित करणे इ. बाबी **"नागरिकांची सनद"** या माध्यमातून साध्य करण्याची संकल्पना आहे. नागरिकांची सनदचे लोकाभिमुखता, प्रतिसादशिलता, पारदर्शकता व गतिमानता हे महत्वाचे पैलू आहेत. त्या अनुषंगाने रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे संगणकीकरण करुन रोजगार वाहीनी http://ese.mah.nic.in ही वेबसाईट दिनांक ३० एप्रिल, २००३ पासून सुरु झालेली आहे. या वेबसाईटवरुन नागरिकांना नांव नोंदणीसह, नूतनीकरण, अपडेशन, ज्येष्ठता पहाणे, नोकरीविषयक जाहिराती पहाणे, सेवायोजन सेवाविषयक उमेदवारांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे इ. सेवा घरबसल्या उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या आहेत. तसेच उद्योजकांना त्यांच्या आस्थापनांची नोंदणी करणे, योग्य व पात्र उमेदवारांचा शोध घेणे, रिक्तपदे अधिसुचित करणे, इ. सुविधा **उद्योजक कॉर्नर** या स्वतंत्र भागात उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या आहेत. शासनाच्या धोरणानुसार बेरोजगार उमेदवारांना स्वयंरोजगाराकडे प्रोत्साहित करण्यासाठी स्वयंरोजगार विषयक विविध योजना, व्यवसाय मार्गदर्शन, व्यवसाय प्रकल्प अहवाल, लायसन्स व परवाने व प्रशिक्षण आदिबाबतची माहिती एकाच ठिकाणाहून सुलभतेने उपलब्ध होण्यासाठी रोजगार वाहिनी वेबसाईटमध्ये स्वयंरोजगाराकरिता त्या स्वतंत्र भागामध्ये देण्यांत आली आहे.

या पुस्तिकेतील पहिल्या भागामध्ये या विभागाची सर्वसाधारण माहिती देण्यांत आली आहे तर दुस-या भागात प्रत्यक्ष नागरिकांची सनद देण्यांत आली आहे. भूमिका, कार्यविषयक माहिती, रोजगार व स्वयंरोजगार विभागांतर्गत असलेल्या रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या सर्व जिल्हा कार्यालयांमार्फत पुरविण्यांत येणा-या सेवा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, लागणारा कालावधी, सेवा विहित कालावधीत पुरविण्यांत आल्या नाहीत तर कोणाकडे तक्रार/संपर्क साधावा त्या अधिका-यांचे पदनाम व दूरध्वनी क्रमांक यामध्ये देण्यांत आले आहेत. मला खात्री आहे की, यात नमूद केल्यानुसार विहित कालावधीत आवश्यक सेवा नागरिकांना निश्चित कालमर्यादेत उपलब्ध होतील.

दिनांक - नोव्हेंबर,२०११.

**संजय कुमार,**
प्रधान सचिव
रोजगार व स्वयंरोजगार विभाग

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| | **भाग-१ सर्वसाधारण माहिती** | |
| १ | रोजगार व स्वयंरोजगार (सेवायोजन)विभागाचा पूर्व इतिहास | १ |
| २ | स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य | २ |
| | अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ | |
| ३ | बेरोजगारांसाठी सेवा सोसायटया स्थापनेचा उपक्रम | ३ |
| ४ | रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत राबविण्यांत येणारे कार्यक्रम - | ४-१० |
| | अ) सेवायोजन क्षेत्र माहिती गोळा करणे | |
| | ब) व्यवसायांची माहिती संकलीत करणे | |
| | क) बेरोजगारांची नाव नोंदणी | |
| | ड) नोकरीसाठी सहाय्य करणे | |
| | ई) व्यवसाय मार्गदर्शन करणे | |
| | फ) शासनाच्या धोरणात्मक योजनांची अंमलबजावणी करणे | |
| | ह) रोजगार व स्वयंरोजगार मेळावे | |
| | ग) कौशल्य विकास कार्यक्रम | |
| ५ | रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेच्या कार्यप्रणालीचे संगणकीकरण | ११ |
| ६ | सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणे) अधिनियम, १९५९ | १२-१४ |
| | **भाग-२ नागरिकांची सनद** | |
| ७ | रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाकडून पुरविल्या जाणा-या सेवा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, कालावधी व सेवा पुरविणारा अधिकारी, इत्यादी | १५-१६ |
| ८ | विभागाचा संरचनात्मक तक्ता. | १७ |
| ९ | विभागातील अधिका-यांचे दूरध्वनी क्रमांक | १८-२५ |

## भाग १ : रोजगार व स्वयंरोजगार विभागाची सर्वसाधारण माहिती

### (१) रोजगार व स्वयंरोजगार (सेवायोजन) विभागाचा पूर्व इतिहास :

**रोजगार व स्वयंरोजगार (सेवायोजन)** ही यंत्रणा दुस-या महायुध्दात जखमी झालेल्या सैनिकांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली जुलै, १९४५ मध्ये स्थापन करण्यात आली आहे. ही सेवा १९४६ पर्यत सैनिकांच्या पुनर्वसनासंबंधाने कार्यरत होती. या सेवेचा विस्तार १९४८ पासून बेरोजगार उमेदवारांसाठी देशभरात सेवायोजन कार्यालयाच्या माध्यमातून सुरु करण्यात आला. तथापि, या संदर्भातील आवश्यकता विचारात घेऊन केंद्र शासनाने देशातील लोकसंख्येच्या प्रमाणात सेवायोजन सेवेचा प्रभावी लाभ कशाप्रकारे जनतेला देता येईल याचा विचार करण्यासाठी १९५२ साली श्री.बी.शिवराव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली . या समितीने सेवायोजन यंत्रणेची संरचना व कार्य याचा अभ्यास करुन त्यात काही सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास तशा शिफारशी करावयाच्या होत्या. त्यानुसार समितीने १९५४ साली केलेल्या शिफारशी विचारात घेऊन केंद्र शासनाने सेवायोजन संघटनेच्या पुनर्रचनेत व्यावसायिक संशोधन, व्यवसाय मार्गदर्शन आणि सेवायोजन क्षेत्राची माहिती इ.बाबींचा समावेश केला. त्याचप्रमाणे या संघटनेच्या दैनंदिन प्रशासनाच्या दृष्टीने सेवायोजन संघटनेचे कामकाज राज्य शासनाकडे १ नोव्हेंबर १९५६ साली हस्तांतरीत केले.

**रोजगार व स्वयंरोजगार** (सेवायोजन) संघटनेचे कामकाज प्रभावीपणे करण्यासाठी लोकसभेव्दारे "सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणे) अधिनियम, १९५९" पारित करण्यात येऊन तो दिनांक १ मे, १९६० च्या नियमावलीन्वये लागू करण्यात आला. या कायद्यातील तरतुदीनुसार २५ व त्यापेक्षा जास्त कामगार / कर्मचारी असणा-या खाजगी आस्थापना आणि सार्वजनिक क्षेत्रांना त्यांच्याकडील रिक्त पदे अधिसुचित करण्याचे व त्यांच्याकडे असणा-या मनुष्यबळाची माहिती देण्याचे बंधन आहे. सेवायोजन संबंधाचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडून सेवायोजन कार्यालयामार्फत राबविले जातात. राज्यपातळीवर असे निर्णय राबविण्याची जबाबदारी आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांच्याकडे असते. या संचालनालयाच्या अधिपत्याखाली राज्यातील सर्व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांचा कारभार चालविला जातो.

शासनाचा महत्वाकांक्षी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीचा कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक १ मे,१९९७ पासून रोजगार व स्वयंरोजगार या स्वतंत्र विभागाची स्थापना केली. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्यात एकूण ५४ रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये (रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे, विद्यापीठ, आदिवासी,तांत्रिक,अपंगार्थ, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रासह) आहेत. महाराष्ट्राच्या ६ महसूली विभागानुसार प्रत्येक महसूल विभागात १ प्रमाणे ६ विभागीय कार्यालये आहेत, अशी रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयासह एकूण ६१ कार्यालये आहेत.

रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या मंत्र्यांच्या अधिपत्त्याखाली प्रामुख्याने राज्यमंत्री, प्रधान सचिव/सचिव, उपसचिव, अवर सचिव आणि कार्यासन (कक्ष अधिकारी) हे मंत्रालयीन पातळीवर काम पहातात. तर आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई यांच्या अधिपत्त्याखाली मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती अशा ६ विभागांमध्ये विभागीय उपसंचालक कार्यरत आहेत. विभागीय उपसंचालकांच्या अधिपत्याखाली ३९ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे, ६ विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्रे तसेच ८ आदिवासी उमेदवारांकरिता रोजगार व स्वयंरोजगार, प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे तसेच १९ जानेवारी १९५९ रोजी मुंबई येथे अपंगांसाठी विशेष मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले असून दि.२९/७/२००४ पासून राज्यातील सर्व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये अपंगार्थ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत.

**(२) स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य :-**

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील लोकांचा सर्वांगिण विकास करण्याच्या दृष्टीने दिनांक २७ नोव्हेंबर, १९९८ रोजी कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागास महामंडळाची स्थापना केली.

**कर्ज योजना :**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत बेरोजगार उमेदवारांसाठी खालील कर्ज योजना राबविल्या जातात :-

| अ.क्र | योजनेचे नांव | कर्ज मर्यादा | व्याजाचा दर |
|---|---|---|---|
| १ | बीज भांडवल योजना | ५ लाख<br>६०% बँकेचे व ३५ % महामंडळाचे, ५% स्वत:चे भांडवल | बँकेचे कर्ज बँकेच्या दराने महामंडळाचे ६% दराने |
| २ | गट प्रकल्प कर्ज योजना | स्वयंसहायता बचत गटांच्या बचतीवर १० पट किंवा किमान १५ लाख | स्वयंसहायता बचत गटाला ४% दराने |

## महामंडळाचे कामकाज जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामार्फत :

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे काम शासन परिपत्रक क्र. इएसई-२००१/प्र.क्र.११६/रोस्वरो-१, दिनांक २२ जून, २००१ अन्वये महामंडळाची स्वत:ची कार्यालये सुरु होईपर्यंत रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या अखत्यारीतील जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामार्फत करण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाचे जिल्हास्तरीय काम जिल्हयाच्या नोडल अधिका-यामार्फत केले जाते. महामंडळाकडून कोरे फॉर्म स्वीकारणे, कर्जाच्या फॉर्मचे वाटप करणे, उमेदवारांकडून अर्जाचे मूल्य स्वीकारणे, अर्जाचे मूल्य महामंडळास पाठविणे, उमेदवारांकडून भरुन आलेले फॉर्म स्वीकारणे, त्याची छाननी करणे, अर्जामधील त्रुटी पूर्ण करुन घेऊन अर्ज महामंडळास पाठविणे, मंजूर झालेले अर्ज महामंडळाकडून स्वीकारणे, मंजूर अर्जातील त्रुटी पूर्ण करुन घेणे, उमेदवार स्वयंरोजगार करणार असलेल्या जागेची तपासणी करणे, महामंडळाकडून धनादेश स्वीकारणे, मिळालेले धनादेश संबंधित उमेदवारांना वाटप करणे, कर्जाची वसुली करणे, थकबाकीदाराविरुध्द खटले दाखल करणे, इ. कामे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत केली जात आहेत.

## (३) महाराष्ट्र शासनाचा बेरोजगारांसाठी सेवा सहकारी संस्था स्थापनेचा उपक्रम :-

महाराष्ट्र राज्यामध्ये नोंदणीपटाप्रमाणे बेरोजगारांची संख्या डिसेंबर, २०१० अखेर २६.८२ लाखावर गेलेली आहे. त्या तुलनेत बेरोजगारांना अगदी नगण्य प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. अल्पशा प्रमाणात उपलब्ध होणा-या रोजगाराच्या संधीमध्ये सर्व बेरोजगारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देणे अशक्यप्राय आहे. त्यावर अनेक उपायांपैकी एक उपाय म्हणून तरुण बेरोजगारांना स्वयंरोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करुन देणे हा होय. बेरोजगारांची तीव्रता कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ऑक्टोबर, २००० मध्ये एक सर्वसमावेशक बेरोजगारांचे नवीन धोरण जाहीर केले. त्यामध्ये बेरोजगार तरुणांनी एकत्र येऊन सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून स्वयंरोजगार सुरु करावा हा हेतू आहे. त्याप्रमाणे विभागात बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करण्याचे कामकाजास सन २००१ पासून सुरुवात झाली. किमान ११ बेरोजगार किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवार एकत्र येऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार सेवा सहकारी संस्था स्थापन करतात व त्यानंतर संबंधित संस्था कामे मिळविण्यासाठी प्रयत्न करतात.

बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना व लोकसेवा केंद्रांना विविध सवलती देऊन त्यांना आर्थिक दृष्टया बळकट करण्यासाठी शासनाने दिनांक १७ ऑगस्ट,२००२ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन बेरोजगार उमेदवारांच्या सेवा सहकारी संस्थांना मोठा दिलासा दिलेला आहे. त्यानुसार शासनाच्या बहुतांश विभागांनी शासन निर्णय पारित करुन बेरोजगारांच्या सेवा सहकारी

संस्थांना कामे देण्याबाबत आपल्या विभागांतर्गत येणा-या कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना शासनाच्या विविध विभागांकडून कामे मिळत आहेत.

<u>बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य :</u>

राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेत सुधारणा करुन, शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या नवीन धोरणांतर्गत बेरोजगार उमेदवारांनी स्थापन केलेल्या सेवा सहकारी संस्थांना त्यांचे कार्यालय स्थापन करणे, कार्यालयासाठी आवश्यक असलेले फर्निचर, दूरध्वनी, विद्युत जोडणी, विविध परवाने मिळविणे, संस्थेचा प्रचार व प्रसार करणे इ. प्राथमिक स्वरुपाची कामे करण्यासाठी येणारा खर्च भागविण्याकरिता बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना प्रती सदस्य प्रती वर्षी रु.१२००/- या प्रमाणे किमान अकरा सदस्यांच्या सेवा सहकारी सोसायटीस वार्षिक रु.१३,२००/- प्रमाणे तीन वर्षाकरिता व्यवस्थापकीय अनुदान देण्याचा निर्णय दिनांक ११ फेब्रुवारी, २००४ रोजी प्रशासनाने घेतला आहे. शासन निर्णय क्र.इएसई-२००३/प्र.क्र.१९१/ रोस्वरो-१, दि.१ फेब्रुवारी २००६ अन्वये बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना व लोकसेवा केंद्राना रु.पाच लाखापर्यंतची कामे विनानिविदा देणेबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**(४) रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयातर्फे विभागात खालील महत्वाचे कार्यक्रम राबविण्यात येतात :**

(अ) सेवायोजन क्षेत्र माहिती गोळा करणे
(ब) व्यवसायांची माहिती संकलीत करणे
(क) बेरोजगारांची नाव नोंदणी
(ड) नोकरीसाठी सहाय्य करणे
(ई) व्यवसाय मार्गदर्शन करणे
(फ) शासनाच्या धोरणात्मक योजनांची अंमलबजावणी करणे
(ह) रोजगार व स्वयंरोजगार मेळावे
(ग) कौशल्य विकास कार्यक्रम

**(अ) सेवायोजन क्षेत्र माहिती गोळा करणे :**

सर्व सार्वजनिक आस्थापना व २५ पेक्षा जास्त कर्मचारी असणा-या खाजगी आस्थापनांकडील मनुष्यबळाची माहिती दर तिमाहीस गोळा करण्यात येते. ही माहिती सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणे) अधिनियम, १९५९ च्या कलम ५ (१) व ५ (२) अन्वये स्थानिक रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रास पाठविणे बंधनकारक आहे. अशा प्रकारची ३४ माहिती पथके विभागातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात कार्यरत आहेत.

**(ब) व्यवसायिक माहिती संकलीत करणे :**

व्यवसाय व शैक्षणिक वर्गीकरणात्मक माहिती दोन वर्षातून एकदा, सम वर्षात सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना व विषम वर्षात खाजगी आस्थापनांकडून गोळा केली जाते.

**(क) बेरोजगारांची नाव नोंदणी :**

विभागात रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत बेरोजगार उमेदवारांची नाव नोंदणी करताना खालील प्रमाणपत्रे तपासली जातात.

(१) शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्मतारीख असलेला इतर कोणताही दाखला
(२) एसएससी बोर्ड / विद्यापीठ प्रमाणपत्र
(३) उमेदवार अपंग / अंध / मुकबधिर असल्यास संबंधित संस्थेचे पात्रता प्रमाणपत्र
(४) शालेय / विद्यापीठ गुणपत्रिका
(५) अनुभव असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र
(६) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत जातीचे प्रमाणपत्र

नाव नोंदणीकरिता वयाची १४ वर्षे पूर्ण होणे आवश्यक आहे. नाव नोंदणी उमेदवार ज्या दिवशी हजर होईल त्याच दिवशी केली केली. ज्या उमेदवारांना नाव नोंदणीसाठी प्रत्यक्ष हजर होणे शक्य नसेल त्यांच्या बाबतीत त्यांनी पोस्टाद्वारे नोंदणीचा अर्ज मागवून पोस्टाद्वारेच तो कार्यालयात पोहचता केल्यास त्यांच्या नावाची नोंदणी करता येते. ही नोंदणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन कामाचे २ दिवसांमध्ये केली जाते. या नोंदणीसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. रोजगार व स्वयंरोजगार सेवांचे विकेंद्रीकरण करण्यात आल्यामुळे आता तालुक्यातील गावपातळीवरुन देखील खाजगी संस्थांकडून शुल्क आकारणी करुन नांव नोंदविण्याची सुविधा लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सद्यस्थितीत ४५ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये देण्यात येणा-या रोजगार सेवा या विकेंद्रिकरणाद्वारे पहिल्या टप्प्यात राज्यात सुमारे ४००० केंद्राद्वारे लवकरच सुरु करण्यात येत आहेत. तसेच टप्प्याटप्प्याने या केंद्रात वाढ होणार आहे. याशिवाय वेबसाईटद्वारे (http://ese.mah.nic.in) online नांव नोंदणी करण्याची सोय सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**फिरते नोंदणी पथक :-**

जिल्हयाच्या मुख्यालयापासून दूरवर दुर्गम प्रदेशात राहणा-या उमेदवारांच्या अडचणीचा व खर्चाचा विचार करुन राज्यातील २१ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांत १ सप्टेंबर, १९८४ व १९ सप्टेंबर, १९८५ पासून फिरती नोंदणी पथके कार्यरत आहेत.

**नूतनीकरण :-**

सध्या उमेदवाराने नावाची नोंदणी केल्यानंतर ती तीन वर्षासाठी वैध राहते. त्यानंतर उमेदवारांना या नोंदणीचे नूतनीकरण करणे गरजेचे आहे. हे नूतनीकरण नोंदणी केलेल्या महिन्याच्या दोन महिने अगोदर, नोंदणीचा महिना तसेच नोंदणीनंतरचे तीन महिने अशा सहा महिन्याच्या कालावधीत केंव्हाही करता येते. या संदर्भात आता नूतनीकरण करुन घ्यावे याबाबतचे एसएमएस ॲलर्ट नूतनीकरण महिन्यामध्ये संबंधित उमेदवारांना पाठविण्यात येतात. तसेच website (http://ese.mah.nic.in) द्वारे online नूतनीकरण करण्याची सोय सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**(ड) नोकरीसाठी सहाय्य करणे :-**

सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणे ) अधिनियम, १९५९ च्या कलम ४ (१) अन्वये विविध आस्थापनांना त्यांच्याकडे रिक्त होणारी पदे सेवायोजन कार्यालयाकडे अधिसुचित करण्याचे बंधन आहे. अशा विविध आस्थापनांकडून प्राप्त होणा-या रिक्त पदांकरिता उमेदवारांचे प्रेषण करताना त्यांच्या नोंदणी ज्येष्ठता, अर्हता आणि वयोमर्यादा यांचा विचार करुन नोकरीसाठी सहाय्य केले जाते. ज्या उमेदवारांची पाठवणी करण्यात आलेली आहे त्यांना एसएमएसव्दारे कळविण्याची सुविधा सुध्दा १ मे, २०११ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

दिनांक २२ ऑगस्ट, १९९६ च्या मा. सर्वोच्य न्यायालय यांचे क्रमांक सिव्हील अपील नं ११६४६-११७२४/१९९६ या प्रकरणी निकालाप्रमाणे कोणत्याही शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी आस्थापनेत रिक्त पदे भरताना नवीन पध्दत ठरविण्यात आलेली आहे. या पध्दतीप्रमाणे सर्व आस्थापनांवर दोन मार्गाने उमेदवारांची यादी प्राप्त करणे बंधनकारक करण्यात आले आहे. :-

(१) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचेकडून पात्र उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेणे.

(२) जाहिरातीव्दारे व अन्य माध्यमातून प्रसिध्दी देऊन पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त करुन घेणे व अशा त-हेने दोन्हीही प्रकारच्या उमेदवारांचा पद भरतीसाठी विचार करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या पत्राप्रमाणे आता सर्व राज्य शासनावर सदर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणेच पद भरती करणे बंधनकारक झाले आहे. म्हणजे कोणत्याही शासकीय / निमशासकीय विभागात पद भरती करताना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे व त्याशिवाय जाहीरातीद्वारे, दूरदर्शन, रेडिओ, नोटीसबोर्ड व इतर माध्यमातून प्रसिध्दी देऊन उमेदवारांचे अर्ज प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन कोणत्याही पात्र उमेदवारांवर अन्याय होऊ नये व दोन्हीही माध्यमाद्वारे उपलब्ध होणा-या

उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. या निर्णयाप्रमाणे जर एखादा उमेदवार रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नोंदणीकृत नसेल किंवा काही कारणामुळे त्याचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत पाठविण्यात आलेल्या यादीत समाविष्ट नसेल, तरी असा पात्र उमेदवार जाहिरातीच्या आधारे संबंधित आस्थापनेकडे सरळ अर्ज करु शकतो.

**(ई) (एक) व्यवसाय मार्गदर्शन कक्ष (करीअर कॉर्नर) :**

रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये व्यवसाय मार्गदर्शनाकरिता आवश्यक ते साहित्य, पुस्तके, माहितीपत्रके इत्यादी उमेदवारांना उपलब्ध असतात व त्यांना वेगवेगळया स्वयंरोजगाराबद्दल मार्गदर्शन दिले जाते. तसेच स्वयंरोजगारासाठी त्यांना प्रवृत्त केले जाते. विविध वित्तीय संस्था उदा. बँका, जिल्हा उद्योग केंद्रे इत्यादींशी संपर्क साधून स्वयंरोजगारासाठी इच्छूक उमेदवारांना मदत दिली जाते.

व्यवसाय मार्गदर्शन कक्षामध्ये मुख्यत्वेकरुन रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षणाच्या संधी तसेच व्यवसाय, शैक्षणिक करिअर इत्यादींबाबत मार्गदर्शन केले जाते. व्यवसाय मार्गदर्शन कक्षाचे काम अधिक प्रभावी बनविण्यासाठी या कक्षामध्येच लायब्ररी सदृश्य करिअर कॉर्नर सुरु करण्यांत आला आहे.

आत्ता पर्यंत राज्यातील ४९ कार्यालयामध्ये करिअर कॉर्नर सुरु झाले आहे. या करिअर कॉर्नरमध्ये रोजगार , स्वयंरोजगार , करिअर मार्गदर्शन व स्पर्धा परिक्षा या संबंधीची पुस्तके/मासिके व वर्तमानपत्र उमेदवारांसाठी उपलब्ध करण्यात आलेली आहेत.

**(दोन) आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र :-**

विविध शासकीय व निमशासकीय संस्थामध्ये आदिवासी उमेदवारांसाठी जागा राखीव असूनही त्या योग्य उमेदवारांअभावी पूर्णपणे भरल्या जाऊ शकत नाहीत, त्यामुळे अनुशेष राहतो. आदिवासी उमेदवारांची स्पर्धा परिक्षेसाठी तयारी करुन घेण्यासाठी सदर केंद्रामार्फत साडेतीन महिन्याचे १ एप्रिल ते १५ जुलै / १ ऑगस्ट ते १५ नोव्हेंबर/ १ डिसेंबर ते १५ मार्च या प्रमाणे दरवर्षी एकूण तीन प्रशिक्षण सत्रे चालविली जातात. या केंद्रामध्ये फक्त शालांत परीक्षा उत्तीर्ण/पदवीधर उमेदवारांना प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात येतो. प्रशिक्षणाच्या काळात आदिवासी प्रशिक्षणार्थींना दरमहा रु.१,०००/- प्रमाणे विद्यावेतन दिले जाते व व्याख्यात्यांना दरताशी रु.१००/-प्रमाणे मानधन दिले जाते. तसेच, प्रशिक्षणार्थींना स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या ४ पुस्तकांचा संच मोफत देण्यात येतो.

प्रशिक्षण देण्यासाठी जवळच्या महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांना तासिका पध्दतीवर नियुक्त केले जाते. तसेच गरजेनुसार बँक/वित्तीय संस्था, मान्यवर सेवाभावी संस्था यातील अधिकारी, पदाधिका-यांना व शासनाच्या तज्ञ अधिका-यांना मार्गदर्शनपर भाषणे देण्यासाठी

पाचारण केले जाते. केंद्रात प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थी उमेदवारांना विविध आस्थापनातील भरतीबाबत माहिती देण्यात येऊन त्यांना मुलाखत तंत्र व स्पर्धा परीक्षांचे स्वरुप याबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देऊन त्यांची त्या विषयात तयारी करुन घेण्यात येते.

महाराष्ट्रात रावेर (जिल्हा - जळगांव), अचलपूर (जिल्हा - अमरावती), कळवण (जिल्हा - नाशिक), देवरी (जिल्हा - गोंदिया), चंद्रपूर (जिल्हा - चंद्रपूर), मंचर (जिल्हा - पुणे), किनवट (जिल्हा - नांदेड) व गडचिरोली (जिल्हा - गडचिरोली) अशा ८ आदिवासी जिल्हयांमध्ये आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत.

**(फ) शासनाच्या धोरणात्मक योजनांची अंमलबजावणी करणे :**

**(एक) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :**

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना सन १९७३-७४ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सेवायोजन कार्यालयात नांव नोंदविलेल्या सुशिक्षित उमेदवारांना त्यांचे कौशल्य व क्षमता वाढविण्यासाठी खाजगी आस्थापनांमध्ये अथवा शासकीय अंगीकृत उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. सदर योजनेच्या प्रयोजनासाठी सुशिक्षित बेरोजगारांची व्याख्या अशी आहे की, ज्या व्यक्तीचे वय १८ वर्षे पूर्ण असून किमान शिक्षण शालांन्त परीक्षा उत्तीर्ण अथवा औद्योगिक प्रशिक्षण उत्तीर्ण अशी आहे. प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थींचा कौशल्य विकास होऊन रोजगार क्षमतेत वाढ होऊन रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या संधीत वाढ होते. सदर योजनेचा कालावधी सहा महिन्याचा असून यासाठी उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे दरमहा रुपये ३००/- ते रुपये १,०००/- विद्यावेतन दिले जाते.

**(दोन) रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात अपंग उमेदवारांसाठी विशेष कक्ष.**

१९ जानेवारी, १९५९ रोजी मुंबई येथे अपंगांसाठी विशेष मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले असून दि.२९/७/२००४ पासून राज्यातील सर्व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये अपंगार्थ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. अपंगाना स्वाभिमानाने जगण्यासाठी शासकीय नोक-यांमध्ये अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम, १९९५ नुसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्टया अपंगासाठी आरक्षण ठेवण्याची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र१२/९७/१६-अ, दि.२ मे,१९९८ अन्वये ३% आरक्षण ठेवण्याची कार्यवाही कार्यान्वीत करण्यात आली आहे.

(तीन) स्थानकोत्तर विद्यापीठ रोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र-

सर्व पदव्युत्तर व व्यावसायिक नि पारंगत पदवीधरांची नोंदणी व प्रेषण तसेच व्यवसाय व अभ्यासक्रमासंबंधिच्या शिष्यवृत्या, मार्गदर्शन विद्यापीठाशी संलग्न असलेल्या विद्यापीठ रोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात येते. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर आणि अमरावती येथे अशी केंद्रे आहेत.

(ह) रोजगार व स्वयंरोजगार मेळावे :

**रोजगार मेळावे.**

या योजनेद्वारे रोजगार मेळाव्यातून उमेदवारांना अनेक उद्योजकांकडे एकाच ठिकाणी मुलाखतीची संधी प्राप्त होते व उद्योजकांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची उपलब्धता करुन देण्यात येते, असे रोजगार मेळावे प्रत्येक जिल्हयात एका वर्षात किमान चार व विभागीय स्तरावर किमान एक असे आयोजित करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्याकरिता जिल्हयाची लोकसंख्या विचारात घेऊन विभागीय स्तरावरील मेळाव्याच्या खर्चास रु.१.०० लाख, मोठया जिल्हयांकरिता रु.६०,०००/- व लहान जिल्हयाकरिता रु.४०,०००/- अशी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. याबाबत शासन निर्णय रोवस्व-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१, दिनांक ०४/०२/२०११ निर्गमित करण्यात आलेला आहे.

**स्वयंरोजगार मेळावे.**

सध्या राज्याच्या २४ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये व्यवसाय मार्गदर्शन कक्ष आहेत. तेथे आवश्यक ते साहित्य,पुस्तके,माहिती पत्रके इ. उमेदवारांना उपलब्ध असतात व त्यांना वेगवेगळया रोजगाराबद्दल मार्गदर्शन दिले जाते. तसेच, स्वयंरोजगारासाठी त्यांना प्रवृत्त केले जाते. विविध वित्तीय संस्था उदाहरणार्थ, बँका, जिल्हा उद्योग केंद्रे इत्यादींशी संपर्क साधून स्वयंरोजगारासाठी इच्छुक उमेदवारांना मदत दिली जाते. स्वयंरोजगाराबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी मेळावे आयोजित करुन व्यावसायिक मार्गदर्शन उपलब्ध करण्याची कामे दरवर्षी केली जातात. उदा. स्वयंसेवी संस्थांचे मार्गदर्शन मिळविणे, आयटीआय बरोबर कार्यशाळा ठेवणे, तांत्रिक क्षेत्रात असणा-या तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळविणे, जसे उद्योजक, एलआयसी मार्फत मेळावे घेणे. खादी-ग्रामोद्योग, जिल्हा उद्योग केंद्र यासारख्या यंत्रणांबरोबर मेळावे किंवा चर्चासत्र ठेवणे इ. रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या नवीन धोरणानुसार आता स्वयंरोजगाराकडे जास्त भर देण्यात येत आहे. त्यामुळे, स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन व मेळावे आयोजित करण्याच्या कामाला प्राथम्य देण्यात येत आहे.

## (ग) कौशल्य विकास कार्यक्रम

पंतप्रधान कार्यालय, नवी दिल्ली यांचे अधिसुचनेव्दारे मा.पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकास संदर्भातील धोरण निश्‍चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाला चालना देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १९ मे, २०१० च्या शासन निर्णयानुसार मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शिखर परिषद व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभाग यांचा दिनांक ०८/०९/२०१० रोजीचा तसेच रोजगार व स्वयंरोजगार विभाग यांचा दिनांक ११/०२/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये "आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार" यांचे पदनाम "आयुक्त, रोजगार , स्वयंरोजगार व कौशल्य विकास " असे सुधारीत करण्यात आले असून राष्ट्रीय कौशल्य विकास अभियानाच्या समन्वयाचे कामकाज सदरहू आयुक्तांकडे सोपविण्यात आले आहे.

राज्यात राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर "जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती " व विभागीय स्तरावर "विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती" स्थापन करण्यात आलेली आहे. या दोन्ही समितीचे मुख्य उद्देश कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी आराखडा तयार करणे, कुशल मनुष्य बळास रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सहाय्य मार्गदर्शन, नियंत्रण करणे व विभागनिहाय प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीचा आढावा घेणे असे आहे.

भविष्य काळातील कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन सन २०२२ पर्यंत राष्ट्रीय स्तरावर ५० कोटी एवढया कुशल मनुष्यबळाचे उद्‍दिष्ट ठरविण्यात आलेले आहे. त्या आधारे महाराष्ट्र राज्यासाठी ४.५ कोटी एवढे उद्‍दिष्ट निश्‍चित करण्यात आलेले आहे. हे उद्‍दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाने स्थापित केलेल्या ११ क्षेत्रनिहाय कौशल्य समित्यांकडून त्या क्षेत्राचे कुशल मनुष्यबळाच्या राज्यस्तरीय कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यक्रमाचे नियोजन, परिवेक्षण व समन्वय करण्याकरिता आयुक्त, रोजगार , स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांच्या अधिपत्त्याखाली एक स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात येत असून या कक्षासाठी व्यावसायिक तज्ञ व्यक्तींची सेवा कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यात येणार आहे.

**(५) रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेच्या कार्यप्रणालीचे संगणकीकरण :**

**संगणकीकरण**

बेरोजगार उमेदवारांना नांव नोंदणी, नूतनीकरण इत्यादी सेवा जलद गतीने मिळाव्यात म्हणून सन १९८५-८६ मध्ये संगणकीकरणाची योजना अंमलात आणली. त्यानंतर टप्प्या- टप्प्याने रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेतील सर्व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राचे संगणकीकरण पूर्ण करण्यांत आले आहे. संगणकीकरणामुळे उमेदवारांची नाव नोंदणी, नूतनीकरण, अपडेशन, स्थलांतर व पाठवणी इत्यादी कामे ऑनलाईन पध्दतीने जलदगतीने करणे शक्य झाले आहे. उमेदवारांना फोटोसहीत संगणकीकृत ओळखपत्र आवश्यक त्या माहितीसह देण्यांत येते. तसेच संगणक प्रणालीद्वारे नियोक्त्यांना तात्काळ त्यांच्या मागणीप्रमाणे संगणकीकृत उमेदवारांची यादी उपलब्ध करुन देण्यात येते.

**वेबसाईट :**

रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेची http://ese.mah.nic.in ही वेबसाईट विकसित करण्यांत आली आहे. या वेबसाईटद्वारे उमेदवारांची नाव नोदणी , नूतनीकरण, अपडेशन, जेष्ठता पहाणे इत्यादी सुविधा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच वेबसाईट मध्ये योजना, व्यवसाय, प्रशिक्षण व स्वयंरोजगार इत्यादी माहिती देण्यांत आलेली आहे. उमेदवारांच्या नावाची शिफारस त्याच्या पात्रतेप्रमाणे नियोक्त्यांकडे केल्यास त्या उमेदवाराला **एसएमएसद्वारे** संदेश देण्याची सुविधा **१ मे, २०११** पासून सुरु करण्यात आली आहे. तसेच नूतनीकरणा अभावी अनेक उमेदवारांची नोंदणी रद्द होत असल्यामुळे असे उमेदवार रोजगार संधीपासून वंचित राहतात हे टाळण्यासाठी उमेदवारांना वेळीच नोंदणीचे नूतनीकरण करुन घ्यावे यासाठी नूतनीकरण करण्यासाठी त्यांना नूतनीकरण कालावधीच्या अंतिम महिन्यात दोन वेळा **एसएमएसद्वारे** स्मरण संदेश देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. नियोक्त्यांकरीता त्यांच्या आस्थापनांची नोंदणी करणे, योग्य उमेदवारांचा शोध घेणे, रिक्तपदे अधिसूचित करणे, विवरणपत्रे सादर करणे इत्यादी सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यांत आल्या आहेत. उमेदवारांचा नोंदणीपट वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आलेला असून त्याद्वारे नियोक्ते, त्यांना अपेक्षित असलेल्या पात्रतेप्रमाणे उमेदवारांची यादी वेबसाईटवरुन उपलब्ध करुन घेऊ शकतात.

**रोजगार विषयक सेवांचे विकेंद्रीकरण :**

राज्यातील विविध ४५ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे यामधून नोकरी इच्छूक उमेदवारांना नांव नोंदणी, नूतनीकरण, शैक्षणिक पात्रता वाढ, नोंदणीचे स्थलांतर व संपर्कात बदल

या सर्व सेवा मोफत उपलब्ध आहेत. यासाठी उमेदवारांना जिल्हा केंद्राच्या ठिकाणी जावून नोंदणी करणे अथवा फिरते पथकासमोर तालुक्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून सेवा घ्यावी लागते. यामध्ये उमेदवारांचा आर्थिक खर्च होऊन वेळ व्यतित होत होता.

या बाबींचा विचार करुन, रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयांमार्फत उमेदवार व नियोक्ते यांना दिल्या जाणाऱ्या सेवा अधिक तत्पर, पारदर्शक, एकात्मिक संगणकीय पध्दतीने व अद्यावत माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सहजतेने मोठ्या प्रमाणावर शहर / ग्रामीण स्तरापर्यंत पोहचविण्यासाठी रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या सेवांचे विकेंद्रीकरण करण्याबाबत शासनाने दिनांक २३ फेब्रुवारी, २०११ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली. या अनुषंगाने दिनांक ५ एप्रिल, व ३ ऑक्टोबर, २०११ रोजी शासन निर्णय निर्गमित झाले आहे.

